# राज्यात राबविण्यात येणारी आवळा लागवड मोहीम

आयुर्वेदिक औषधामध्ये सर्वात जास्त वापर होणारी वनौषधी म्हणजे आवळा होय. मनुष्याच्या अधिकांश आजारावर आवळा कुठल्या तरी स्वरुपात वापरला गेला आहे/वापरला जात आहे. औषधी म्हणून आवळा वापरला जातोच परंतु विभिन्न खादय पदार्थातही आवळयाचा उपयोग होतो. सुपरिचित असे दैनंदिन उपयोगात असलेल्या त्रिफळा चुर्णातील सर्वात महत्वाचा घटक म्हणजे आवळा होय. तसेच आवळा आहारदृष्टया अत्यंत पौष्टिक असून त्यात क जीवनसत्व सर्वात जास्त असते. या व्यतिरिक्त आवळयात कॅरोटीन, निकोटीनीक ॲसिड, पेकटीन ही जीवनसत्वे आढळून येतात. आवळा खाल्ल्याने शरीरातील क जीवनसत्वाची कमतरता भरुन निघते. ताप, हगवण, मधुमेहावर सुध्दा आवळयाचा उपयोग होतो. आवळयापासून नित्योपयोगी पदार्थ उदा. आवळयाचा मुरंबा, कँडी, लोणचे, ज्यूस, चटणी, सॉस यांची निर्मिती मोठया प्रमाणावर होते.

आवळा हे औषधी वृक्ष आर्थिकदृष्टया अत्यंत लाभदायक फळझाड असून कोरडवाहू प्रदेशात चांगल्या प्रकारे वाढू शकते. तसेच संशोधनात्मक निष्कर्षाच्या आधारावर असे निदर्शनास आले आहे की, क्षारयुक्त जमिनीत ज्यामध्ये क्लोराईडस् व बायोकार्बोनेटचे प्रमाण जास्त असते, तसेच चिबड व चोपण जमिनीत सुध्दा आवळयाची यशस्वी लागवड होऊ शकते.

वरील बाबींचा विचार करुन राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ, नवी दिल्ली यांनी देशातील सर्व राज्यात राज्य औषधी वनस्पती मंडळामार्फत, आवळा लागवडीची महत्वाकांक्षी मोहिम राबविण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळामार्फत ही मोहीम महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येत असून त्यात खालील संस्था सहभाग भाग घेऊ शकतात.

१. राज्य वनविभाग
२. राज्य सामाजिक वनीकरण विभाग
३. शाळा महाविदयालये
४. आयुर्वेद, होमिओपॅथी आणि युनानी महाविदयालये/हॉस्पिटल/दवाखाने
५. वैदयकीय महाविदयालये
६. कारागृह
७. अशासकीय संस्था/नागरी सहकारी संस्था
८. विदयापीठे

यासाठी संस्थेच्या क्षेत्रावर लागवड केल्यास महाराष्ट्र राज्य औषधी वनस्पती मंडळ त्यास अर्थसहाय्य उपलब्ध करुन देईल. यासाठी मोठया प्रमाणावर संस्थांनी या मोहिमेत भाग घ्यावा असे आव्हान करण्यात येत आहे.

अधिक माहितीसाठी संपर्कासाठी खालील पत्यावर संपर्क करावा.

व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४१० ००५.
दुरध्वनी -०२० - २५५३४८६०.
वेबसाईट : www.mahanhm.gov.in
: www.mahaagri.gov.in
ईमेल - mshmpbmed@gmail .com.

**G:\Amla.doc**